भारतीय वन सेवेतील २०१६ च्या बॅचच्या अधिकाऱ्यांकरिता कनिष्ठ समय वेतनश्रेणीतील सहाय्यक वनसंरक्षकाच्या सहा अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.आयएफएस-१२१८/प्र.क्र.४३/फ-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.४०००३२.
दिनांक १ मार्च, २०१८.

वाचा :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-९/भावसे/मेटर-४/प्रक्र.१८(१६-१७)/३१२१/१६-१७, दि.७.२.२०१८.

२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक पदनि-२०१२/प्र.६६/१२/वित्तीय सुधारणा-१, दि.११.७.२०१२.

३) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक पदनि-२०१६/प्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.२.२०१६.

शासन निर्णय :-

भारतीय वन सेवेतील सन २०१६ च्या बॅचमधील महाराष्ट्र संवर्गाचे अधिकारी हे इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी, डेहराडून येथील भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांकरिताचे त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करुन पुढील ४ महिन्याच्या On the job Training (OJT) करिता एप्रिल २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात देहरादून येथून कार्यमूक्त होऊन सरळ राज्य शासनाच्या सेवेत रुजू होणार आहेत. त्यांच्याकरिता कनिष्ठ समय वेतनश्रेणीत (वेतन श्रेणी Level १० in the Pay Matrix) खालीलप्रमाणे सहाय्यक वनसंरक्षकाची ६ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात येत आहेत. सदर अधिसंख्य पदे दि.१ मे, २०१८ ते ३० एप्रिल, २०१९ या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	वनवृत्ताचे नाव	वन विभाग
१.	श्री. सुमंत सुभाषराव सोळंके, भावसे	गडचिरोली	गडचिरोली
२.	श्री. एस. नवकिशोर रेड्डी, भावसे	नागपूर	भंडारा
३.	श्रीमती पुनम विलास पते, भावसे	नागपूर	गोंदिया
४.	श्रीमती दिव्या भारती एम., भावसे	चंद्रपूर	मध्य चांदा
५.	श्री. सुमित कुमार, भावसे	नागपूर	नागपूर
६.	श्री. कुमारस्वामी एस. आर., भावसे	यवतमाळ	यवतमाळ

उक्त अधिकाऱ्यांकरिता दि.१ मे, २०१८ ते ३० एप्रिल, २०१९ या कालावधीकरिताचा सदर पदावरील वेतन व भत्यापोटी येणारा खर्च प्रधानशिर्ष “ मुख्य लेखाशिर्ष २४०६-वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर), १०१ वनसंधारण व विकास, १०१ (०१) प्रशासन व संरक्षण (२४०६ ००९६) ०१-वेतन ” या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१२/प्र.६६/१२/ वित्तीय सुधारणा-१, दि.११ जुलै, २०१२ व शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०११६५९२०४११९ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.03.01 17:56:45 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. संचालक, इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी, डेहराडून.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.
६. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर/नागपूर/यवतमाळ/गडचिरोली.
७. उप वनसंरक्षक, यवतमाळ/गोंदिया/भंडारा/गडचिरोल्ली/ मध्य चांदा /नागपूर.
८. संबंधित परिविक्षाधीन भावसे अधिकारी.
९. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
१०.कोषागार अधिकारी, नागपूर/अमरावती/यवतमाळ/गोंदिया/भंडारा/गडचिरोली.
११.सहायक संचालक, भावसे (लेखा) कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई..
१२.निवड नस्ती, फ-७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.